भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क. ५५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—३१/०८/२०१६

**१) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

**अ)** दिनांक ३०/०८/०१६ रोजी ११.०० ते ११.३० वा. दर. टाटा एस वाहन क्र. एमएच ४० वाय ७७१४ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन पवनी येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. रामटेके पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी १७.४५ वा. दर. दरम्यान आरोपी हिरो होंडा डिलक्स मोटार सायकल क्र. एमएच ३६/२११६३ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल दारू पिवुन दारूच्या नशेतएनएच ६ रोडवर आडवीतीडवी चालवितांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोना. खडसे पो. स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो. स्टे. साकोली हे करीत आहे.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २९/०८/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील मृतक घनश्याम माहादेव आतीलकर वय ५० वर्ष, रा. इंदिरा नगर केसलवाडा याने आपल्या अंगातील लाल कथीया रंगाचे बनीयानने बाभळीचे झाडाला गळफास लावुन मरण पावला असे फिर्यादी अर्जुन माहादेव आतीलकर वय ६८ वर्ष, रा. इंदिरा नगर केसलवाडा यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोउपनि. कुंभरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २८/०८/२०१६ रोजी १३.१५ वा. दर. यातील मृतक समन महादेव बावणे वय ५० वर्ष, रा. मोगरा शिवनी ची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास आकस्मीत विभाग सा. रु. भंडारा येथे नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पो.स्टे. लाखनी येथे प्राप्त आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशी. चव्हान पोस्टे लाखनी येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**५) <u>नाल्याच्या पाण्यात बुडुन महीलेचा मृत्यु. . :–</u>**

दिनांक ३०/०८/२०१६ रोजी ०५.०० वा. पासुन ते १६.०० वा. दर. यातील मृतक सौ. किसनाबाई हरिचंद्र मेश्राम वय ६० वर्ष, ही नेहमी प्रमाणे पालांदुर शेत शिवारातील मरी नाल्याकडे संडासला गेली होती ती घरी परत आली नाही. म्हणुन १०.००वा. दर. नाल्यामधील पाण्यात पडुन बुडुन मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी अर्जुन हरीचंद मेश्राम वय ४० वर्ष, पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पालांदुर येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी सफौ. कोल्हे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.